# प्रकरण : पाचवे

## उपसंहार

# प्रकरण : पाचवे

## उपसंहार

पाहिल्या प्रकरणांमध्ये भारतातील राजकीय व सामाजिक चळवळीचा अभ्यास केलेला आहे. भारतामध्ये १८५० नंतर वेगवेगळ्या सामाजिक व राजकीय संघटनाची निर्मिती झाली. या संघटनामध्ये ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफीकल सोसायटी इत्यादी संघटनाची निर्मिती झाली. १८८५ ला स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय सभेने राजकीय चळवळीस समाजाभिमुखता प्राप्त करुन दिली. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी इत्यादी नेत्यानी वेगवेगळी आंदोलने करुन परकीय शक्तीस विरोध केला. अखेर १९४७ ला भारतास स्वातंत्र्य मिळाले.

प्रस्तुत शोधनिबंधाची गरज, अभ्यासाचा उद्देश, प्रकरण योजना व माहितीचे संकलन कशाप्रकारे केले याचा उल्लेख केला आहे. भारतामध्ये निर्माण झालेले राजकीय पक्ष, वेगवेगळ्या परिस्थितीत निर्माण झालेल्या स्वातंत्र्य चळवळी कार्य करणाऱ्या कॉंग्रेस पक्षातूनच अनेक राजकीय पक्ष निर्माण झाल्याचे आढळतात. [१] स्वातंत्र्योत्तर काळातप्रथम कॉंग्रेससह साम्यवादी पक्षाचा भारतीय राजकारणात प्रभाव होता. १९५८ नंतर भाषीक तत्वावर घटकराज्याची निर्मिती झाल्यानतंर भारतामध्ये अनेक प्रादेशिक राजकीय पक्षाची निर्मिती झाली. या प्रादेशिक पक्षांना अल्पावधीतच पाठिंबा मिळाला. कारण या प्रादेशिक पक्षांनी प्रादेशिक अस्मितेच्या प्रश्नाचा स्विकार केल्यामुळे त्याना प्रतिसाद मिळाला.

शिवसेनेच्या स्थापनेपूर्वी महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती ही पुरोगामी स्वरुपाची होती. धर्मपेक्षा जातीभेद इत्यादी विरोधी पाऊले सत्यशोधक समाज, परमहंस सभा इत्यादी सामाजिक संघटनानी समाज सुधारणेसाठी उचलल्याने समाज व्यवस्था सुधारलेली होती. त्याकाळी महाराष्ट्रातील आर्थिक उत्पादनाची साधनावर प्रामुख्याने परप्रांतीय लोकांची

परप्रांतीय लोकांची मिरासदारी होती. महाराष्ट्रीयन लोकांची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. त्यावेळी नुकताच संयुक्त महाराष्ट्र चळवळीने महाराष्ट्र राज्याची स्थापना केली होती. परंतु बेळगांव, बिदर, भालकी, कारावार हा मराठी भाषीक प्रदेश कर्नाटकातून महाराष्ट्रात सामील झाला नव्हता. त्यामुळे लोकांची सीमाप्रश्नी तीव्र भावना निर्माण झाली होती. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांनी आपल्या पुरोगामी विचारांचा प्रसार करुन फक्त महाराष्ट्रीयन लोकांची संघटना स्थापन्यावर भर दिला होता. तसेच मार्मिक या साप्ताहिकाने मराठी लोकांच्यावर होणा-या आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अतिक्रमणाची माहिती प्रसिध्द केली होती. अशाप्रकारे मुंबईत महाराष्ट्रीयन मराठी लोकांची मने जागृत करुन बाळ ठाकरे व त्यांच्या सहका-यानी शिवसेनेची स्थापना केली. मुंबईमध्ये मराठी भाषिक लोकांच्या प्रश्नाचा पुरस्कार केल्यामुळे शिवसेनेला लोकमताचा पाठिंबा मिळत गेला. प्रथम दक्षिण भारतीय लोकांना विरोध करत सेना इतर परप्रांतीयांनाही विरोध करु लागली. मुंबईत साम्यवादी चळवळीस विरोध केल्यामुळे भांडवलदार व कॉंग्रेस पक्षाचा पाठिबा मिळत गेला.[२] मुंबईमध्ये वाढत चाललेल्या बेकारीमुळे बेकार तरुणांचा वर्ग सेनेच्या आक्रमक धोरणामुळे आकर्षित झाला व सेनेचा मुंबईमध्ये झपाट्याने प्रसार झाला.

दुस-या प्रकरणामध्ये मुंबईतील शिवसेनेची संघटनात्मक रचना कशाप्रकारे बाळ ठाकरेंच्याभोवती फिरत होती. बाळ ठाकरे सांगतील तोच शेवटचा निर्णय मानुन सेनेच्या कार्यकारिणीतील सदस्य, विभागप्रमुख, नगरसेवक व शाखा आपले कार्यक्रम पार पाडत असत. सेनेत इतर पदाधिका-याना कोणत्याही प्रकारचे स्वतंत्र स्थान नाही. बाळ ठाकरेंच्या हुकूमशाही नेतृत्वाखाली कारभार चालतो. शिवसेनेची संघटनात्मक रचना ही विस्कळीत स्वरुपाची असूनही सक्रिय कार्यकर्त्यांच्या जोरावर तसेच बाळ ठाकरेंच्या आक्रमक संमोहित भाषण शैलीमुळे लोक सेनेकडे आकृष्ट होत असतात.

शिवसेनेने प्रथमपासून कोणतीही एक ठरावीक विचारसरणी स्विकारल्याचे दिसत नाही. कालानुरूप आपल्या विचारसरणीत बदल केल्याचे दिसून येते. प्रथम दक्षिण भारतीयांना विरोध केला. साम्यवादी चळवळीस विरोध, महाराष्ट्रीयन मराठी लोकांचे हीतसंबंध जोपासण्याचे कार्य करत सेना १९८५ नतंर महाराष्ट्रभर पसरु लागली. तिच्या कार्यक्षेत्रात वाढ झाल्यानतंर तिने आपल्या विचारसरणीतही बदल घडवून आणला. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागातील स्थानिक प्रश्नाचे मांडणी करून, तसेच परधर्मीय लोकांचा व्देष करून सेना महाराष्ट्रभर पसरली. महाराष्ट्राची आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक पिछेहाटीचे मांडणी करून बाळ ठाकरेच्या नेतृत्वाच्या करिश्म्यामुळे सेनेचा प्रसार झपाट्याने झाला.

शिवसेनेने राजकीय क्षेत्रामध्ये सहभागी झाल्यानतंर आपल्या हीसंक व आक्रमक कारवाया कमी केल्या.[3] या राजकीय सहभागामध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये अनेक वर्षे सत्ता उपभोगली व प्रभावी पक्ष म्हणून कार्य केले. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांतही सेनेचे प्रतिनिधी काम करत आहेत. १९९० ला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत तिने उल्लेखनीय कामगिरीमुळे यश संपादन केले आहे. शिवसेनेच्या एकूण राजकीय कारकीर्दीत शिवसेनेने सतत आपल्या धोरणात बदल घडवून आणल्यामुळे लोकमताचा पाठिंबा त्याना व्यापक प्रमाणात मिळत गेला. सेनेने आपल्या राजकीय पाठिंब्यात वाढ होण्याकरिता समाजातील इतर सामाजिक क्षेत्राच्या, उदा.कामगार क्षेत्र, महानगरपालिका समाजउपयोगी सेवा-अशा माध्यमातून कार्य करणे सुरु केले. संघटनेतील प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वतंत्र नेतृत्व निर्माण करून संघटनेचे अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला.[4] सेनाप्रमुखानी आपल्या अधिकाऱ्यांची विभागणी संघटनेच्या विविध अंगात केल्यानतंर सेनेच्या पाठिंब्यात वाढ झाली असल्याचे दिसते.

तिसऱ्या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्ह्यांचो भौगोलिक व सांख्यिकी रचना स्पष्ट केली आहे. या रचनेमुळे शिवसेना प्रसारास योग्य

वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्याची राजकीय, आर्थिक, सामाजिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या संपन्न, राजकीयदृष्ट्या जागरूक, पुरोगामी विचारसरणीचा व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेला जिल्हा आहे. छ.शाहू महाराजांच्या या भूमीत पुरोगामी विचारांची पक्की बांधणी झालेली असूनही आज धार्मिक व जातीयवादी संघटनांची निर्मिती येथे झालेली आढळते व त्यांना पाठिंबाही मिळत असल्याचे दिसते. यात प्रामुख्याने शिवसेना, हिंदू एकता, दलित पँथर इत्यादींचा समावेश होतो. हिंदूत्ववाद, मराठेशाहीचा उज्जवल इतिहासचा पुरस्कार करून शिवसेना कोल्हापूरात स्थापन झाली. मुंबईमध्ये शिवसेनेने समाजउपयोगीवछत्रपती शिवाजी महाराजाच्या कार्याचा पुरस्कार करून महाराष्ट्रीयन मराठी माणसांचा पाठिंबा मागितला व मराठी माणसाच्या हीतासाठी केलेल्या कार्याचा व बाळासाहेब ठाकरेच्या आक्रमक व प्रभावी विचारामुळे सेनेची कोल्हापूरात स्थापना झाली.

चौथ्या प्रकरणांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यांत शिवसेनेला मिळत असलेल्या व्यस्त पाठिंब्यामुळे प्रारंभीच्या काळात शिवसेनेचा प्रसार मंदगतीने झाला. महाराष्ट्रीयन राजकारणात जसजसे सेनेचे महत्व वाटत गेले, तसतसे सेनेच्या प्रतिसादात वाढ झाली. या काळात कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेने प्रामुख्याने समाजपयोगी सेवा कार्यावर भर दिल्याचे दिसते. रक्तदान शिबीरे, आरोग्य शिबीरे, रुग्णवाहिका सेवा, वृक्षारोपन [५] इत्यादी कार्यामुळे लोकमत शिवसेनेस अनुकूल असे बनत गेले. याखेरीज कोल्हापूर जिल्ह्यातंर्गत असणाऱ्या विविध प्रश्नासंबंधी शिबीरे आंदोलने मोर्चे आयोजित करून शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचे काम केले. यात मुख्यत: कोल्हापूर शहराचा पाणीप्रश्न, शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून केलेल्या आंदोलनाचा समावेश होतो.[६]

शिवसेनेने कोल्हापूर जिल्ह्यात राजकीय सहभाग मुख्यत: १९९० च्या विधानसभा निवडणूकीत घेतला. या निवडणूकीत शिवसेनेने कोल्हापूर

जिल्ह्यातील १२ पैकी २ जागा जिंकल्या व आपल्या शक्तीचा प्रत्यय आणून दिला. त्यानंतरच्या महानगरपालिका निवडणुकीत ६० पैकी ८ उमेदवार निवडून आले. लोकसभेच्या १९९१ च्या मध्यावती निवडणुकीत सेनेला प्रभावी कामगिरी करता आली नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील सेनांतर्गत गटबाजीमुळे शिवसेना आपले प्रभावी स्थान निर्माण करू शकली नाही. अंतर्गत मतभेदामुळे संघटनेच्या प्रसारावर मर्यादा आल्या. गटबाजीतून १९८८ ला शिवाजीराव चव्हाण हा शिवसेनेचा माजी कोल्हापूर जिल्हाप्रमुख अनेक कार्यकर्त्यांसह सेना सोडून गेला. यामुळे सेनेच्या प्रभावात घट झाल्याचे दिसते.

दिपंकर गुप्ता यांचे मते मुंबईमध्ये शिवसेनेचा प्रसार हा हिंदूत्ववाद व साम्यवादास विरोध केल्यामुळे झालेला नसून मुंबईतील परप्रांतीयांना विरोध, आर्थिक असमानता व बेकारीच्या प्रश्नामुळे झालेला आहे. परंतु कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेनेचा प्रसार हा प्रामुख्याने हिंदूत्ववादी धोरणाचा पुरस्कार व स्थानिक प्रश्नाचा पुरस्कार केल्यामुळे झाला. कोल्हापूर जिल्हा हा आर्थिकदृष्टया प्रगत असल्यामुळे तसेच कारखानदारी वाढलेमुळे याठिकाणी आर्थिक व बेकारीचे प्रश्न मर्यादीत स्वरुपात आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यांत अल्पसंख्याक मुस्लीम व ख्रिश्चन तसेच परप्रांतीय लोक संख्येने कमी असल्यामुळे शिवसेनेने त्यांना विरोध करण्याचे धोरण कमी केल्यामुळे अनेक धर्मीय लोक सेनेत सहभागी झाले. हे लोक शिवसेनेचा पाठिंबा मिळावा व स्वताच्या सुरक्षिततेसाठी सेनेत सहभागी झाल्याचे दिसून येतात.

अशाप्रकारे शिवसेनेचा अभ्यास करत असतांना शिवसेनेत पुढील दोष दिसून येतात.

(१) शिवसेना लोकशाही शासन प्रणालीला विरोध करत आहे. दळभद्री लोकशाहीस शिवसेनेत थारा नाही अशी विधाने बाळ ठाकरे करतांना दिसतात. परंतु या लोकशाहीच्या सहाय्याने सेना नेते वाटेल ती विधीने करू शकतात व

राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करत आहेत.[७]

[२] हुकूमशाहीवृत्ती-शिवसेनेने लोकशाहीस विरोध करुन हुकूमशाहीचे समर्थन केले आहे. बाळ ठाकरे यांनी स्वःताची हुकूमशाही सेनेत चालावी यासाठी सेनेची रचना पध्दतशीरपणे निर्माण केली आहे. ठाकरेच्या मते लोक कल्याणार्थ हुकूमशाही राबविणे आवश्यक आहे. सेनेने आणीबाणीस पाठिंबा देऊन हुकूमशाहीस पाठिंबा दिल्याचे दिसते. [८]

[३] साम्यवादी पक्षांना विरोध -

मुंबईमध्ये साम्यवादी पक्षाच्या वाढत्या प्रसारास रोखण्यासाठी कॉंग्रेसने सेनेस पाठिंबा दिला. या पाठिंब्यामुळे मुंबईत सेना अल्पावधीतच पसरली. मुंबईत सेनेने वारंवार कम्युनिस्टांच्यावर हल्ले केल्याचे दिसून येते. कम्युनिस्ट आमदार कृष्णा देसाईच्या खुनात शिवसैनिकांचा हात असल्याचे दिसून येते.[९]

[४] दलितांना विरोध :

अनेक निवडणूकात दलितांशी युती करुनही रिडल्स इन हिंदूइझम मधील वादग्रस्त प्रकरण व मंडल आयोगास विरोध करुन सेनेने दलित व हिंदूच्या पोटजातींना विरोध केल्याचे दिसते.[१०]

[५] परधर्मियांचा व्देष -

शिवसेनेने हिंदूत्ववादी धोरण स्विकारल्यापासून परधर्मियांचा व्देष करणे सुरु केले. यामध्ये प्रामुख्याने मुस्लीम, ख्रिश्चन इत्यादी धर्मीय लोकांचा समावेश होतो. हिंदूची मते आकृष्ट करण्यासाठी सेनेने परधर्मीय व्देषाचे राजकारण सुरु केले.[११]

[६] संकुचित विचारसरणी

सेनेने प्रथम प्रांतवादी व नंतर हिंदूत्तवादाच्या संकुचीत विचारसरणीचा अवलंब केला. या विचारांचा प्रचार केल्यामुळे राजकीय यश मिळत असल्याचे पाहून सेनेने प्रखर हिंदूत्ववादी धोरणांचा अवलंब केला. अशाप्रकारे सेनेचा हिंदूत्ववाद हा स्वार्थी स्वरुपाचा होता.[१२]

[७] निश्चित विचारसरणीचा अभाव

शिवसेनेचा आजपर्यंतचा इतिहासपाहिला असता असे दिसून येते की, सेनेने कोणत्याही प्रकारची निश्चित विचारसरणीचा स्विकार केलेला नाही. परिस्थितीनुरुप आपल्या विचारसरणीत बदल घडवून आणला आहे.[१३]

[८] अलिखीत घटना

शिवसेनेची घटना कोणत्याही प्रकारच्या लिखीत स्वरुपात आढळत नाही. पदाधिकारी कोण ? शाखा किती ?, त्यांचे व्यवहार कसे चालतात याचा खुलासा होत नाही. कार्यालयीन कागदपत्रांच्या अभावामुळे लिखीत खुलासा मिळत नाही तर तोंडी माहिती दिली जाते.[१४]

[९] कोणतेही आंदोलन तडीस नेले नाही :

शिवसेनेने आजपर्यंत वेगवेगळ्या आंदोलनात भाग घेतला ही आंदोलने तात्पुरता राजकीय फायदा मिळविण्यासाठी त्यांनी हाती घेतली होती. त्याचा पाठपुरावा शेवटपर्यंत केलेला दिसत नाही. यामध्ये मुबंईत मराठी माणसांचा प्रश्न, सीमा आंदोलन इत्यादीचा समावेश होतो.[१५]

[१०] निष्ठावंतावर अन्याय -

शिवसेना निर्मितीपासून तिच्या प्रसारासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या निष्ठावंत लोकांवर अन्याय केल्याचे दिसून येते. पदाच्या अपेक्षेने विरोधी पक्षातून आलेल्या लोकांना संघटनेची व राजकीय पदे दिल्याचे दिसते. चंद्रिका केनीया, बाबासाहेब भोसले इत्यादींना सेनेत सामावून घेतले, तर सुभाष पाटील [औरंगाबाद] मोतीराम तांडेल इत्यादी निष्ठावंतावर अन्याय केल्याचे दिसून येते. सामान्य कार्यकर्त्यांची प्रतिक्रीया पुढील प्रतिक्रीया व्यक्त करतांना दिसतो. "सेना नेत्यानी आपल्या तुंबडया भरून घेतल्या. सामान्य कार्यकर्ता मात्र भिंती रंगवत राहिले, पोस्टरला चिक्की लावत बसला." [१६]

[११] इतर दोषांमध्ये असे दिसून येते की, शिवसेनेने आपल्या राजकीय फायद्यांसाठी गुंड पदरी बाळगले. त्यांना उमेदवारी दिली. वृत्तपत्राच्या कार्यालयावर, तसेच पत्रकारांच्यावर हल्ले केले, वानखेडे स्टेडियमच्या खेळपट्टीची नासधूस केली. जबरदस्तीने धारा तेलाचे वितरण केले इत्यादी अनेक प्रकरणांत शिवसैनिकांनी अरेरावीपणाची वागणूक केली. [१७]

वरील प्रकारे शिवसेनेच्या संघटनेत दोष दिसून येत असले तरी शिवसेनेस कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसताना एका तत्वचिंतक पित्याचा वारसा लाभलेल्या व्यंगचित्रकाराने काढलेली ही पक्ष संघटना कोणत्याही प्रकारचा आर्थिक, सामाजिक व राजकीय कार्यक्रम नसतांना राज्यात सत्तेवर येण्याचे आव्हान निर्माण करु शकते हा चमत्कार केवळ याच पक्षाने भारतीय राजकारणात केल्याचे दिसून येते. अशा त-हेने कोल्हापूर जिल्ह्यांतील शिवसेना एक अभ्यास हा प्रबंध पूर्ण करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

# संदर्भसुची


[१] विलास भोईटे - भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,
शिवाजी विद्यापीठ प्रकाशित, १९७२, पान नं.२७

[२] गुप्ता दिपंकर - नेटीव्हीजम इन मेट्रोपॉलीस शिवसेना इन बॉम्बे,
मनोहर प्रकाशन दिल्ली, १९८२, पान नं. १८७.

[३] उपरोक्तप्रमाणे, पान नं. १८८.

[४] उपरोक्तप्रमाणे, पान नं. १८९.

[५] कोल्हापूर जिल्हा शिवसेना कार्यालयातील नोंदी.

[६] श्री.प्रतापसिंह जाधव, [संपादक] - दैनिक पुढारी, १० मे, १९९०
पान नं.१

[७] लटपटे सुंदर - "शिवसेनेचा धोका", सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०,
पान नं.२८

[८] तोरसेकर भाऊ - "शिवसेनेचा झंझावात, १९८९, पान नं.३४

[९] लटपटे सुंदर-"शिवसेनेचा धोका",सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०
पान नं.१

[१०] उपरोक्तप्रमाणे पान नं.२५

[११] उपरोक्तप्रमाणे पान नं.१९

[१२] उपरोक्तप्रमाणे पान नं.२०

[१३] गुप्ता दिपंकर, नेटीव्हीजम इन मेट्रोपॉलीस शिवसेना इन बॉम्बे,
मनोहर प्रकाशन दिल्ली,१९८२ पान नं १८७

[१४] उपरोक्तप्रमाणे पान नं. १८८.

[१५] जयश्री देसाई - "लोकप्रभा" दिवाळी अंक, १९९२, पान नं.

[१६] संजय राउत - "लोकप्रभा," १ मार्च, १९९१, पान नं.९

[१७] उपरोक्तप्रमाणे.


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## संदर्भ ग्रंथ

[१] अश्रफ अली, कम्युनल फॅसीझाम एँज ॲनालिसीस ऑफ जामा अँट इ-इस्लामी, मेनस्ट्रीम, १९६५

[२] ॲनॉनिमस, शिवसेनेची धमकी सांप्रदाईकता विरोधी समिती दिल्ली.

[३] ॲनॉनिमस, शिवसेनेचा मुखवटा, मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटी, मुंबई १९७२

[४] भोईटे विलास - भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, शिवाजी विद्यापीठ, प्रकाशन १९७२

[५] भोळे बी.एन आणि देशपांडे एन.आर, - भारताचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९७८

[६] कश्यप एस.बी. - द पॉलीटीक्स ऑफ डिफेक्शान अ स्टडी ऑफ स्टेट पॉलीटीक्स इन इंडिया नॅशनल पब्लिकेशन हाउस दिल्ली, १९६९.

[७] चौधरी चंद्रगुप्त - शिवसेनेचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९

[८] डांगे एस.ए. - शिवसेना ॲन्ड द बॉम्बे रायटर्स, सी.पी.आय पब्लिकेशन दिल्ली, १९६९

[९] दर्यापूरकर राजेश, सेनापती, अभिजीत प्रकाशन, नागपूर, १९९०

[१०] धुमे बी.एस. ठाकरे बाय द कामगार सेना, बी.एस.धुमे यांचेकडून प्रकाशीत, १९७३

[११] गंगाधरण के.के. - शिवसेना - ॲन्टी सोशल मुव्हमेंट, मेनस्ट्रीम, १९७०

[१२] गुप्ता दिपंकर, नेटीव्हीजम इन मेट्रोपॉलीस शिवसेना इन बॉम्बे, मनोहर प्रकाशन दिल्ली, १९८२

[१३] हॅरिसन सेलींग - द चॅलेंज टू इंडियन नॅशनॅलिझम, फॉरेन अफेअर्स व्हॉल्यूम २७ नं.११, नोव्हेंबर, १९५६

[१४] हर्टसन एच. - पॉलिटीकल पार्टीज इन इंडिया, मीरट, १९७१

[१५] ओव्हरी जेसी - मिलीटेंट अँन्ड प्रोटेक्टीव्ह रिजनलॅलीझाम इन इंडिया, इंडियन पॉलिटीकल सायन्स रिव्हू व्हॉल्युम-७, नं.१, ऑक्टोबर १९७२, मार्च,१९७३

[१६] कोठारी रजनी - पार्टीसिस्टीम अँन्ड इलेक्शन स्टडीज, एशिया पब्लिकेशन हाउस, मुंबई, १९६७

[१७] कोठारी रजनी - कास्ट इन इंडियन पॉलिटीक्स, ओरिएन्ट लॉगमन दिल्ली, १९७०

[१८] कपिलाचार्य - शिवसेनेची भाषणे, प्रकाशक बाळ ठाकरे,१९६७

[१९] लटपटे सुंदर - शिवसेनेचा धोका सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०

[२०] पन्नीकर के.एस. - पार्टीज अँन्ड पॉलीटीक्स इन इंडिया करंट्र हिस्टरी,१९५९

[२१] पारधीवाला एच.आर. - शिवसेना का हवी व का नको ? पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७

[२२] पाटील व्ही.बी. - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८६

[२३] प्रॉब्लेम ऑफ महाराष्ट्र - (इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रिडम मुंबई, १९६०)

[२४] रानडे एम.जी. - द राईझ ऑफ मराठा पॉवर, पब्लिकेशन डिव्हिजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, दिल्ली,१९६१

[२५] सरदेसाई जी.एस. - द मेन करंट ऑफ मराठा हिस्टरी,फिनीक्स पब्लिकेशन, मुंबई, १९४९

[२६] सावरकर व्ही.डी. - हिंदू पद पादशाही, भारतीय साहित्य सदन, दिल्ली, १९७१

[२७] श्रीनिवास एम•एन• - द नेचर ऑफ द प्रॉब्लेम ऑफ इंडियन युनिटी, इकॉनॉमिक विक्ली, २६ एप्रिल, १९५८

[२८] सुब्बाराव बी• - रिजन ॲन्ड रिलीजनॅलीझम इन इंडिया, इकॉनॉमिक विक्ली, व्हॅल्यूम १०, नं•३८, १९५८

[२९] ठाकरे बाळ - हिंदूत्व, प्रकाशक बाळ ठाकरे, १९८८

[३०] ठाकूर योगेंद्र - बाळासाहेब, आमोद प्रकाशन, मुंबई, १९९१

[३१] तोरसेकर भाऊ - शिवसेनेचा झंजावात, आमोद प्रकाशन, मुंबई १९८९•

[३२] विल्कोन्सन पी - सोशल मुव्हमेंट, पालमेल प्रोज, लंडन,१९७१•

[३३] मासिके, साप्ताहिके व वृत्तपत्रे.

मासिक - नवे पर्व.

साप्ताहिक - लोकप्रभा.

" "श्री"

" चित्रलेखा.

" मार्मिक.

" खतरनाक.

पाक्षिक चतुरस्त्र.

शिवसेना प्रमुख षष्ठ्यब्दीपूर्ती विशेषांक १९

दैनिके .... दै•पुढारी, कोल्हापूर.

" सकाळ, कोल्हापूर.

" सामना, मुंबई•

" महानगर, मुंबई.

[illegible] LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLH[illegible]